महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

Rs.2/-

शुक्रवार ■ ०१ ऑगस्ट २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०४१ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024


# राज्यातील बांगलादेशी घुसखोरांचे जन्मदाखले रद्द होणार ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील सर्व बांगलादेशी घुसखोरांचे जन्मदाखले येत्या 15 ऑगस्ट रोजी रद्द करण्यात येणार आहेत. तसेच त्यांच्याकडे इतरही काही शासकीय कागदपत्रे असल्यास तीही रद्द करण्याची मोहीम लवकरच हाती घेतली जाईल, असे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले. बुधवारी ते मंत्रालयात आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते.

त्यांनी सांगितले की, गेल्या अनेक वर्षांपासून भारतात मोठ्या प्रमाणात बांगलादेशी घुसखोर राहात आहेत. राज्यातील मुंबई, ठाणे, पुणे यांसारख्या मोठ्या शहरांतही त्यांनी घुसखोरी केली आहे. स्थानिक महसुली अधिकाऱ्यांना हाताशी धरून ते वेगवेगळ्या प्रकारचे दाखले काढत आहेत. या दाखल्याच्या बळावर ते आपण येथील स्थानिक रहिवासी असल्याचे दर्शवत आहेत. या प्रकारांना प्रभावीरीत्या आळा घालण्यासाठी महसूल खात्याने विशेष मोहीम हाती घेण्याचे ठरवले आहे.

**सिंधी कुटुंबांना मालमत्तापत्र देणार**

दरम्यान, राज्यात ठाणे आणि उल्हासनगर वगळता इतर 35 शहरांमधील सुमारे 5 लाख विस्थापित सिंधी परिवारांना मालमत्तापत्र देण्यात येणार असल्याची माहितीही मंत्री बावनकुळे यांनी दिली. फाळणीनंतर पाकिस्तानातून भारतात आलेल्या सिंधी समाजाकडे कोणत्याही प्रकारची सरकारी कागदपत्रे नाहीत. त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असल्यामुळे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनानुसार महसूल विभागाने त्यांना मालमत्तापत्र देण्याचा निर्णय घेतला आहे. नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सिंधी समाजाच्या शिष्टमंडळाला फडणवीस यांनी याबाबत आश्वासन दिले होते. या आश्वासनाची पूर्तता झाली असल्याचे समाधान बावनकुळे यांनी व्यक्त केले.

**ठाणे आणि उल्हासनगर वगळता इतर 35 शहरांमधील सुमारे 5 लाख विस्थापित सिंधी परिवारांना मालमत्तापत्र देण्यात येणार असल्याची माहितीही मंत्री बावनकुळे यांनी दिली**

**बांगलादेशी घुसखोरांकडे शासकीय कागदपत्रे असल्यास तीही रद्द करण्याची मोहीम लवकरच हाती घेतली जाईल**



## तहसीलदारांना 15 ऑगस्टचा अल्टिमेटम

दरम्यान, राज्यात उघडकीस आलेल्या जन्म प्रमाणपत्र घोटाळ्याची गंभीर दखल घेत महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रशासनाला मोठा आदेश दिला आहे. सरकारने आतापर्यंत रद्द केलेली 42 हजार 189 जन्म प्रमाणपत्रे परत मागवण्याचे निर्देश त्यांनी सर्व तहसीलदारांना दिले असून, येत्या 15 ऑगस्टपर्यंत ही प्रमाणपत्रे ताब्यात घ्या असा स्पष्ट अल्टिमेटम त्यांनी दिला आहे. महाराष्ट्रात आणि देशात गेल्या काही महिन्यांपासून बांगलादेशी आणि रोहिंग्याच्या रहिवाशी असल्याचा मुद्दा चर्चेत असून घुसकोरी करुन हे भारतात राहत आहेत. त्यात, विशेषत: मुंबईत अनेक ठिकाणी पोलिसांच्या कारवाई बांगलादेशी नागरिकांना अटक करण्यात आली आहे. त्यामध्ये, काही महिला असून या महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ देखील मिळाल्याचे वृत्त माध्यमांत झळकले होते. राज्यातील विविध जिल्ह्यांमधून फसव्या पद्धतीने बनवलेली जन्म प्रमाणपत्रे शासनाच्या निदर्शनास आली आहेत. यावर कारवाई करताना सरकारने या सर्व बनावट वा अनधिकृतरीत्या तयार झालेल्या 42189 प्रमाणपत्रांची रद्दीकरण प्रक्रिया पूर्ण केली आहे. मात्र त्यापैकी केवळ 11053 प्रमाणपत्रेच शासनाने प्रत्यक्षात परत मिळवली आहेत अशी माहिती समोर आली आहे.



थोडक्यात महत्वाचे

# अंबरनाथ काटई राज्यमार्गावरील पुल रखडला



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ काटई राज्यमार्गावर अंबरनाथ औद्योगिक वसाहतीजवळ अप्रतिम हॉटेल शेजारचा पूल अनेक वर्षांपासून रखडला आहे. वालधुनी नदीवर तीव्र उतार आणि चढाव असल्याने काटईकडे जाणाऱ्या मार्गिकवर अनेक अवजड वाहने बंद पडतात. त्यामुळे येथे नव्या पुलाच्या उभारणीला २०२३ मध्ये मंजुरी मिळाली होती. मात्र दोन वर्षांनंतरही रस्त्याचे बहुतांश काम पूर्ण झाल्यानंतरही या मार्गावरचा हा पूल तयार होऊ शकलेला नाही. परिणामी येथे कोंडी होत असून दोनच दिवसांपूर्वी येथे ट्रेलर बंद पडल्याने वाहतुकीवर परिणाम झाला होता. आता या पुलाचे काम पावसाळ्यानंतर सुरू करण्याचे नियोजन असल्याने एमआयडीसी प्रशासनाकडून सांगितले जाते आहे.

अंबरनाथ शहरातून जाणारा अंबरनाथ काटई राज्यमार्ग वाहतुकीसाठी अत्यंत महत्वाचा आहे. या मार्गावर अंबरनाथजवळ वालधुनी नदीवर औद्योगिक वसाहतीच्या पुढे एक पूल आहे. सुमारे ४० वर्षे जुना हा पूल अंबरनाथहून काटईकडे जाणाऱ्या मार्गिकवर तीव्र उताराचा आहे. तर अंबरनाथकडे जाणाऱ्या मार्गिकवर हा पूल रस्त्याच्या समांतरच आहे. मात्र काटईकडे जाणाऱ्या मार्गिकवर तीव्र उतार आणि काही क्षणात तीव्र चढ असल्याने येथे अनेक अवजड वाहनांना वाहने हाकताना त्रास होतो. अनेकदा अवजड वाहने येथून संथगतीने चालतात. अनेकदा त्यांचा वाहनावरील नियंत्रण सुटते की काय या भीतीने मागून येणारी वाहने थांबून घेतात. त्यामुळे अनेकदा अपघाताची भीतीही असते.

याच ठिकाणी सोमवारी एक अवजड वाहन बंद पडले होते. त्यानंतर सुमारे पाच तास वाहतूक संथगतीने सुरू होती. त्यामुळे वाहनांचा खोळंबा होत होता. त्याचा फटका वाहनचालकांना बसला. यापूर्वीही अनेकदा येथे वाहने बंद पडली आहेत. एका अवजड वाहनाचे नियंत्रण सुटल्याने मोठा अपघात झाला होता. त्यामुळे येथील तीव्र उतार कमी करून शेजारच्या पुलाला समांतर असा नवा पूल बांधण्याची मागणी होत होती. काटई अंबरनाथ राज्यमार्गाच्या काँक्रीटीकरणाच्या कामात या पुलासाठी १० कोटींचा निधीही मंजूर करण्यात आला होता. मात्र आजतागायक या पुलाचे काम सुरू होऊ शकलेले नाही. त्यामुळे वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते आहे. हा पूल कधी होणार असा प्रश्न आता उपस्थित केला जातो आहे.


दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta

https://www.facebook.com/jeevandeepnews

https://www.instagram.com/thane_jeevandeep

https://jeevandeepvarta.com


# बदलापूरकरांचा रेल्वेच्या असुविधांशी सामना

## जुने सरकते जिने बसवून लाखो प्रवाशांची फसवणूक



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता. ३१ :** कोट्यवधींचा महसूल देणाऱ्या बदलापूरच्या दीड लाख प्रवाशांच्या तोंडाला पाने पुसण्याची कामे रेल्वे प्रशासनाने केल्याचा दावा महाविकास आघाडीकडून करण्यात आला आहे. रेल्वेस्थानकाचे अद्ययावतीकरण करताना जुने सरकते जिने बसवून बदलापूरकरांची फसवणूक केल्याचा आरोप महाविकास आघाडीने केला आहे. या संदर्भात रेल्वेस्थानकावर येऊन सरकत्या जिन्याची पाहणी केली असता, ही बाब खरी असल्याचे दाखवत कामाची पोलखोल केली आहे.

मध्य रेल्वेवरील सर्वाधिक गर्दीचे आणि रेल्वेला सर्वाधिक महसूल देणाऱ्या स्थानकांमध्ये बदलापूर हे महत्त्वाचे स्थानक आहे. असे असूनही आम्हाला अशी सापत्न वागणूक रेल्वे प्रशासनाकडून दिली जात असल्याची खंत राष्ट्रवादीचे प्रदेश सरचिटणीस अविनाश देशमुख यांनी व्यक्त केली आहे. बदलापूर स्थानकातून लाखों प्रवासी रेल्वेने प्रवास करतात. आमच्याकडे रेल्वे फेऱ्या कमी आहेतच. हा अन्याय होत असताना आता जुने साहित्य आम्हाला नवीन करून दिले जात आहे. यात आमची फसवणूक होत असल्याचे उद्धव ठाकरे गटाचे शहरप्रमुख किशोर पाटील यांनी केला आहे. हा जिना काढून या ठिकाणी नवीन सरकता जिना बसवण्याची मागणी मविआने केली आहे. जर आमची मागणी पूर्ण झाली नाही तर, मोठे जनआंदोलन उभारण्यात येईल, असा इशारा मविआने दिला आहे. या वेळी रेल्वेस्थानकावर मविआचे अनेक पदाधिकारी आणि कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

इतर स्थानकांवरील वापरात नसलेले सरकते जिने बदलापूरकरांच्या माथी मारले जात आहेत. दीड लाख बदलापूरकर रेल्वेने रोज प्रवास करतात. त्यांच्याकडून मिळणाऱ्या कोट्यवधी रुपये निधीचा प्रशासन अशा प्रकारे वापर करते का? जुने साहित्य नवीन करून दिले जात आहे. हे सहन करणार नाही. लवकरच हा जिना बदलण्यात यावा; अन्यथा मोठे जनआंदोलन उभारू.

**- अविनाश देशमुख, प्रदेश सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस**

*********

सार्वजनिक निधीचा अपव्यय न करता, जबाबदारीने तो निधी वापरण्याच्या सूचना आहेत. बदलापूर रेल्वे प्रवाशांची कोणतीही अडचण होऊ नये, यासाठी सहा नवीन आणि वाढीव दोन स्थलांतरित असे एकूण आठ सरकते जिने बदलापूर स्थानकात उभारत आहोत. कल्याण-बदलापूर तिसऱ्या आणि चौथ्या मार्गिकच्या प्रकल्पासाठी ट्रॅक अलाइनमेंटच्या कामासाठी उल्हासनगर फलाट क्रमांक एकवर २०१६ मध्ये सरकता जिना वापरात आला. त्याचे अजूनही २१ वर्षांचे आयुर्मान शिल्लक आहे. तो स्थलांतरित करून बदलापूर स्थानकात त्याचा पुनर्वापर करण्यात येत आहे. या सरकत्या जिन्याची त्याच्या उत्पादक कंपनीकडून तपासणी करण्यात आली आहे. त्यानंतरच हा जिना बदलापूर स्थानकात उभारण्यात येत आहे.

**- सुनील उदासे, मुख्य जनसंपर्क अधिकारी, एमआरव्हीसी प्रशासन**

# रापमंचे मुख्यालय बनले अस्वच्छतेचे आगार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे शहर, ता. ३१**

ठाणे जिल्ह्याचा कारभार चालणाऱ्या एसटीच्या मुख्य कार्यालयाला अस्वच्छतेचा वेढा पडला आहे. कार्यालयाच्या आवारात पसरलेली दुर्गंधी आणि सांडपाण्यामुळे येथे डासांची निर्मिती झाली असून, कर्मचाऱ्यांच्या आरोग्याचा प्रश्न उभा राहिला आहे. मुख्यालयाच्या आवारात कचरा, राडारोडा आणि गटारांच्या उघड्या झाकणांमुळे कार्यालयात दुर्गंधी पसरली आहे.

ठाणे जिल्ह्याचा एसटीचा कारभार ठाण्यातील लालबहादूर शास्त्री मार्ग, वंदना सिनेमा परिसरात असललेल्या मुख्यालयातून चालतो. येथे केवळ जिल्हाभरातूनच नव्हे, तर राज्यभरातून कर्मचारी कामाच्या निमित्ताने येतात. निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांचाही येथे सतत राबता असतो; मात्र सध्या पावसात हे मुख्यालय डासांचे आगार बनले आहे. कर्मचाऱ्यांना इमारतीच्या आवारात वावरताना डासांच्या हल्ल्याचा सामना करावा लागतो.

विशिष्ट प्रकारचे हे डास अंगावरून हाकलण्याचा प्रयत्न केला तरीही ते उडून न जाता रक्त शोषणाचा प्रयत्न करताना दिसून येतात. इमारतीच्या आवारात पावसाचे पाणी साचले असून, जमिनीतून सतत सांडपाणी वाहात असते. त्यामुळे हा परिसर सतत ओला असतो. तसेच इमारतीच्या पाठीमागील शौचालयातून निघणारी दुर्गंधी मुख्यालयात पसरते. याबाबत विभागीय अभियंते विजय रेडेकर यांना प्रतिक्रिया विचारली असता या विषयावर नंतर बोलू असे सांगून प्रतिक्रिया देणे टाळले.

इमारतीच्या भिंतीजवळ तोडलेल्या झाडांचे ओंडके ठेवण्यात आले असल्याने येथे अडगळ निर्माण झाली आहे. या ठिकाणी सांपांनी आश्रय घेतल्याचे येथील कर्मचारी सांगतात. शौचालायला जाताना अनेकदा ते दिसून येतात. त्यामुळे त्यांच्याकडून दंश होण्याची भीती कर्मचाऱ्यांकडून व्यक्त होत आहे. मुख्यालयाच्या मागे कार्यालयाचा रेकॉर्ड रूम असून, त्याच्या भिंतींना भेगा पडल्या आहेत. त्यामुळे त्या कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. येथील प्रशिक्षण सभागृहालासुद्धा घाणीच्या पाण्याचा वेढा पडला आहे. प्रशिक्षणार्थिनादेखील येथे बसणे कठीण होत आहे.

**मुख्यालयाच्या मागे कार्यालयाचा रेकॉर्ड रूम असून, त्याच्या भिंतींना भेगा पडल्या आहेत. त्यामुळे त्या कधीही कोसळण्याची शक्यता निर्माण झाली आहे.**

# दिवा-सीएसएमटी लोकलसाठी प्रवाशांचा न्यायालयीन लढा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** दिवा रेल्वे स्थानकातून फास्ट लोकल सुरू करण्यासाठी गेल्या 11 वर्षांपासून दिव्यातील प्रवाशांकडून निवेदने, स्वाक्षरी मोहिम, मोर्चे, आंदोलने, आमरण उपोषण आणि ठिय्या आंदोलन करण्यात येत आहे. पण रेल्वे प्रशासनाकडून याची फारशी दखल घेतली जात नसल्यामुळे आता रेल्वेच्या विरोधात उच्च न्यायालयामध्ये दाद मागण्याचा निर्णय दिव्यातील सामाजिक कार्यकर्त्यांनी घेतला आहे. गेल्या 29 दिवसांपासून सामाजिक कार्यकर्ती अश्विनी केंद्रे यांनी दिवा स्थानकात ठिय्या मांडूनही दिवा फास्ट लोकलच्या मागणीचा आग्रह धरला होता. पण फास्ट लोकल संदर्भात ठोस अश्वासने मिळत नसल्याने अमोल केंद्रे यांनी जनहित याचिकेद्वारे न्यायलयीन लढा देण्याचा निर्णय घेतला आहे. दिवा रेल्वे स्थानकातील प्रवासी संख्या वेगाने वाढत आहे. त्या तुलनेत लोकल सेवा अपुरी ठरत आहे. 2014 च्या आगोदर पासून दिवा फास्ट लोकलची मागणी केली जात आहे. त्यासाठी दिव्यातील प्रवाशांनी उग्र आंदोलनेही केली होती. त्यावेळी दिवा रेल्वे प्रवाशांसाठी काही मोजक्या फास्ट लोकल थांबवण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाकडून घेण्यात आला होता. पण ह्या फास्ट लोकलचा थांबा आता अपुरा ठरू लागला आहे. त्यामुळे दिवा स्थानकातून फास्ट लोकल सुरू करण्याची मागणीसाठी दिव्यातील प्रवासी संघटनांकडून जोर धरू लागला आहे.






# जिल्हाधिकारी अशोक शिनगारे सेवानिवृत

## घाणेकर नाट्यगृहात सेवापूर्ती समारंभ



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे हे नियत वयोमानानुसार दि.31 जुलै 2025 रोजी सेवानिवृत झाले असून डॉ.काशिनाथ घाणेकर नाट्यगृह, ठाणे (प.) येथे त्यांच्या निरोप समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. जिल्ह्यातील शासकीय अधिकारी-कर्मचारी, प्रसारमाध्यम प्रतिनिधी व नागरिक तसेच आमदार कुमार आयलानी, किसन कथोरे,खासदार बाळ्या मामा, कोकण विभागीय आयुक्त विजय सूर्यवंशी,माजी खासदार कपिल पाटील आदी मान्यवर या समारंभास उपस्थित होते.

# श्रीकृष्णनाथ पांचाळ ठाण्याचे नवे जिल्हाधिकारी



दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** राज्य शासनाने बुधवारी भारतीय प्रशासकीय सेवेतील (आय.ए.एस) काही अधिकाऱ्यांची बदल्या केल्या आहेत. यामध्ये ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या निवृत्तीमुळे झालेल्या रिक्त पदावर श्रीकृष्णनाथ पांचाळ यांची नियुक्ती केली आहे. पांचाळ हे यापूर्वी जालन्याचे जिल्हाधिकारी होते. ते आज, गुरुवार दुपारनंतर ते पदभार स्विकारणार आहेत, अशी माहिती सुत्रांनी दिली.

ठाणे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे हे नियत वयोमानानुसार गुरुवार, ३१ जुलै रोजी सेवानिवृत होत आहेत. त्यामुळे ठाणे जिल्हाधिकारी पद रिक्त झाले होते. त्यांच्या जागी राज्य शासनाने बुधवारी भारतीय प्रशासकीय सेवेतील नवीन अधिकाऱ्याची नेमणुक केली आहे. या संबंधीचा आदेश राज्य शासनाने तसे आदेशाचे पत्र बुधवारी सायंकाळी काढले आहे. यात जालन्याचे जिल्हाधिकारी श्रीकृष्णनाथ पांचाळ यांची ठाण्याचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



# गीतासार

## अध्याय १८
## मोक्षसंन्यासयोगः

न हि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः । यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥ १८-११ ॥

कारण शरीरधारी कोणत्याही माणसाकडून पूर्णपणे सर्व कर्मांचा त्याग केला जाणे शक्य नाही. म्हणून जो कर्मफळाचा त्यागी आहे, तोच त्यागी आहे, असे म्हटले जाते. ॥ १८-११ ॥

अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् । भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥ १८-१२ ॥

कर्मफळाचा त्याग न करणाऱ्या मनुष्यांना कर्माचे बरे, वाईट व मिश्र असे तीन प्रकारचे फळ मेल्यानंतर जरूर मिळते; परंतु कर्मफळाचा त्याग करणाऱ्या मनुष्यांना कर्माचे फळ कधीही मिळत नाही. ॥ १८-१२ ॥

पञ्चैतानि महाबाहो कारणानि निबोध मे । साङ्ख्ये कृतान्ते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ॥ १८-१३ ॥

हे महाबाहो अर्जुना, सर्व कर्मांच्या सिद्धींची ही पाच कारणे, कर्मांचा शेवट करण्याचा उपाय सांगणाऱ्या सांख्यशास्त्रात सांगितली गेली आहेत, ती तू माझ्याकडून नीट समजून घे. ॥ १८-१३ ॥

## रेसिपी
# फराळी कटलेट



प्रत्येक गृहिणीला उपवासाला काय वेगळं करावं हा प्रश्न पडतो. पण काय करावं ते सुचत नाही. त्यामुळे प्रत्येक उपवासाला म्हणजेच एकादशी असो किंवा संकष्टीला परंपरागत चालत आलेले साबुदाणा किंवा भगरीचे पदार्थ आपण करतो. किंवा बटाट्याचे पदार्थ करतो. तसेच आज आपण जरा काहीतरी वेगळा असा बटाट्याचा उपवासाचा पदार्थ करणार आहोत.

**साहित्य**

उकडलेले बटाटे - 1 कप
काळी मिरी पावडर - 1 चमचा
जिरं पावडर - 1 चमचा
हिरव्या मिरचीची पेस्ट - 1 चमचा
शेंगदाणे - 1/2 कप
लिंबाचा रस - 1 चमचा
मीठ

**कृती :**

फराळी कटलेट बनवण्यासाठी सर्वात आधी एका भांड्यात उकडलेला बटाटा, काळी मिरी पावडर, मीठ, जिरं पावडर, हिरव्या मिरचीची पेस्ट, शेंगदाण्याचे तुकडे, लिंबाचा रस टाकून एकजीव करुन घ्यावे.

यानंतर हाताना तेल लावून घ्या.

हातावर तयार मिश्रणाचे लहान लहान कटलेट तयार करून घ्यावेत.

पॅनमध्ये तेल गरम करण्यास ठेवा.

तेल गरम झाले की, कटलेट हलके ब्राउन रंगाचे होईपर्यंत परतून घ्यावेत.

अशा पद्धतीने तयार झाले आहेत फराळी कटलेट.

तुम्ही शेंगदाण्याच्या चटणीसोबत किंवा खोबऱ्याच्या चटणीसोबत सर्व्ह करू शकता.

# अनधिकृत बांधकामांचे नियमितपणे निष्कासन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : दिनांक २९/०७/२०२५ रोजी दुपारी ०१:०० वाजता भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचे प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर, भा.प्र.से. यांनी कॉन्फरन्स हॉल, तिसरा मजला, मुख्य प्रशासकीय इमारत येथे प्रभाग समिती क्र. १ ते ५ मध्ये कार्यरत बिट निरीक्षक तथा सहा. पदनिर्देशित अधिकारी यांनी आढावा बैठक घेतली. सदर बैठकीमध्ये प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर यांनी मनपा हद्दीत होत असलेल्या अनधिकृत बांधकामांसंदर्भात तीव्र नाराजी व्यक्त करून मा. मुंबई उच्च न्यायालयातील सुमोटो याचिका क्र. ०१/२०२० मध्ये दिनांक २६/०२/२०२२ रोजीच्या न्यायनिर्णयाचे काटेकोरपणे पालन करून, अनधिकृत बांधकामांवर निष्कासन कारवाईचे निर्देश संबंधितांना दिले. सन २०२२ पासूनच्या एकूण २९१ अनधिकृत बांधकामांवर कारवाईचे निर्देश यावेळी आयुक्तांनी दिले. त्यानुसार दर महिन्याला प्रत्येकी प्रभागात किमान ०२ अनधिकृत बांधकामांवर पूर्णतः निष्कासनाची कारवाई करणेचे उद्दिष्ट संबंधितांना दिले. तसेच आता प्रभागात बिट निरीक्षकांना सहाय्य करण्यासाठी अतिरीक्त मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

तसेच यापुढे कोणतेही अनधिकृत बांधकाम होणार नाही तसेच सुरू असलेल्या अनधिकृत बांधकामे तातडीने थांबवून त्यावर निष्कासनाची कारवाई करणेबाबतची दक्षता पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी घ्यावी अन्यथा संबंधितांची जबाबदारी निश्चित करण्यात येईल अशी स्पष्ट ताकीद यावेळी आयुक्तांनी दिली. तसेच यापूर्वी झालेली काही बांधकामे नियमित करता येत असतील तर नियमानुसार दंड आकारून नियमित करणेबाबत प्रस्ताव सहा. संचालक, नगररचना विभाग यांचेकडे सादर करणेबाबत मार्गदर्शन केले. अनधिकृत बांधकामे, धोकादायक इमारती हटवितांना, वेळोवेळी दिलेल्या सुचनांनुसार पोलीस विभागाशी समन्वय साधून, पर्याप्त बंदोबस्त उपलब्ध करून घेणेबाबत योग्य ते नियोजन करावे असे देखील आयुक्तांनी यावेळी नमूद केले. तसेच प्रभाग स्तरावर अनधिकृत व धोकादायक इमारतींवर करण्यात येणाऱ्या कार्यवाहीचा साप्ताहिक अहवाल सादर करणेचे निर्देश दिले.

> **सदर आढावा बैठकीस श्री. विक्रम दराडे, उपआयुक्त (अ.बां. व अति. नि.), श्री. अरविंद घुगरे, नियंत्रण अधिकारी, अन. बांध. व अति. निष्का. विभाग तसेच प्रभाग समिती क्र. १ ते ५ चे बिट निरीक्षक उपस्थित होते.**
> **- विक्रम दराडे, उपायुक्त (अन. बांधकाम)**

वरील सर्व कामे व आदेशांबाबत उपआयुक्त (अ.बां. व अति.नि.) श्री. विक्रम दराडे यांनी वरील सर्व कामकाजावर नियंत्रण ठेवून, त्याचा वेळोवेळी आढावा घेण्याचे आदेश देखील आयुक्तांनी यावेळी दिले.

# भिवंडी मनपाच्या सेवानिवृत्त कर्मचा-यांना निरोप

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : महानगरपालिका सेवेतून नियत वयोमानाप्रमाणे ०७ कर्मचारी सेवानिवृत्त व स्वेच्छा निवृत्त झाल्याने महापालिकेचे प्रशासक तथा आयुक्त श्री. अनमोल सागर (भा. प्र. से) यांनी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेतर्फे सेवानिवृत्त कर्मचा-यांना कार्यक्रमाच्या माध्यमातून निरोप देणेत आला. याप्रसंगी उप-आयुक्त (मुख्यालय) श्री. विक्रम दराडे यांच्या शुभहस्ते शाल व पुष्पगुच्छ देऊन यथोचित सत्कार करण्यांत आला आणि त्यांनी सेवानिवृत्त कर्मचा-यांना त्यांच्या पुढील आयुष्याकरीता शुभेच्छाही दिल्या.



महानगरपालिकेच्या नविन प्रशासकीय इमारतीच्या तिस-या मजल्यावरी स्व. विलासराव देशमुख सभागृहात संपन्न झालेल्या या निरोप समारंभाच्या कार्यक्रमातून श्री. रमेश बंडु थोरात (सहा. आयुक्त शिक्षण) स्वेच्छानिवृत्त, श्री. गोपाल एस सिंह (फ़ॉर्मासिस्ट) सेवानिवृत्त, श्री. रतन दत्तात्रेय गोसावी, (वाहनचालक) सेवानिवृत्त, श्री. इम्रान सिंकंदर खतीब (वाहनचालक) सेवानिवृत्त, श्री. मालू धाको मोरघे (रोड मुकादम) सेवानिवृत्त, श्री. कैलास बाळीकराम तेलवणे (सॅ. का) सेवानिवृत्त, श्री. अख्तरअली मोह. शरीफ़ (सॅ. का) अशा ०७ सेवानिवृत्त व स्वेच्छानिवृत्त मनपा कर्मचा-यांना महानगरपालिकेच्यावतीने आज निरोप देण्यांत आला. या प्रसंगी मनपा अधिकारी व कर्मचारी, सर्व कर्मचारी संघटना प्रतिनिधी, सेवानिवृत्त कर्मचा-यांचे कुटुंबातील सदस्य इ. उपस्थित होते.

## साहित्य भारती कल्याण तर्फे
# मासिक काव्यसंमेलन संपन्न

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : शनिवार दिनांक २६ जुलै २०२५ रोजी अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती कल्याण शाखेतर्फे गुरुपौर्णिमा व दीप अमावास्या यांचे औचित्य साधत कल्याण शाखाध्यक्ष प्राध्यापक तथा साहित्यिक नारायण फडके यांच्या अध्यक्षतेखाली कल्याण येथे काव्यसंमेलन पार पडले.

सदर काव्यसंमेलनास साहित्य भारती कोंकण प्रांत कार्याध्यक्ष तथा ज्येष्ठ साहित्यिक प्रवीण देशमुख, साहित्य भारती कोंकण प्रांत मंत्री डॉ.शामसुंदर पांडे, साहित्य भारती कोंकण प्रांत कोषाध्यक्ष तथा प्रज्ञावंत साहित्यिक शारदासुत सुनील म्हसकर यांची विशेष उपस्थिती लाभली. यावेळी उपस्थित साहित्यिकांनी 'गुरु' आणि 'दीप' या विषयावर आधारित हिंदी व मराठी भाषांमधून कविता, अभंग, दोहे आदी विविध प्रकारच्या काव्यरचना आणि



वैचारिक लेख सादर केले.

कल्याण डोंबिवली परिसरातील साहित्य प्रेमींनी आणि अखिल भारतीय साहित्य परिषद डोंबिवली येथील कार्यकारणी सदस्यांनी आपल्या सुंदर सुंदर काव्यरचना ताल आणि लेख उत्तम प्रकारे सादर केले. साहित्य भारती कोकण प्रांत कार्याध्यक्ष प्रवीण देशमुख यांनी 'हृदयातील दीप' अशी अनोखी रचना सादर केली. साहित्य भारती कोंकण प्रांत मंत्री डॉ.शामसुंदर पांडे यांनी प्राचीन ते आधुनिक असा गुरु महिमा वर्णन केला. तर प्रज्ञावंत साहित्यिक शारदासुत सुनील म्हसकर यांनी गुरूंचे आपल्या जीवनातील स्थान 'गुरुने दिला ज्ञानरूपी वसा' या विषयावरील उत्तम वैचारिक लेखाचे प्रकट वाचन केले. कार्यक्रम अध्यक्ष प्रा. नारायण फडके यांनी सुभाषिताच्या माध्यमातून गुरु महात्म्य सुंदर प्रकारे वर्णन करून सांगितले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्कृष्टपणे शाखा सचिव दुर्गेश कुमार दुबे यांनी केले. शाखा कार्याध्यक्ष प्राजक्ता कुलकर्णी यांनी उपस्थितांचे आभार मानले. शाखा अध्यक्ष प्रा. नारायण फडके यांच्या निवासस्थानी काव्य संमेलन अगदी आनंद उत्साहाने संपन्न झाले.

## तेथे कर माझे जुळती

# लोकमान्य टिळक स्मृति दिन



लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या विचारांमुळे इंग्रज सरकारच्या दरबारी ते 'राजमान्य' कधीच झाले नाहीत .परंतु लोकांच्या दरबारी मात्र ते ' लोकमान्य' झाले. लोक सेवेचे व्रत घेतलेल्या या लोकोत्तर पुरुषाचा जन्म रत्नागिरी येथे 23 जुलै 1856 रोजी झाला. वडील गंगाधर पंत हे संस्कृत पंडित आणि गणित विषयाचे तज्ञ होते. त्यांच्या विद्वत्तेचा टिळकांवर खोल परिणाम झाला. संस्कृत आणि गणित या दोन्ही विषयांवर पुढे त्यांनी प्रभुत्व मिळवलं. मॅट्रिक पास झाल्यावर पुढच्या शिक्षणासाठी बाळ टिळक पुण्याच्या डेक्कन कॉलेजमध्ये दाखल झाले.

त्यांचे मित्र होते गोपाळ गणेश आगरकर .आगरकर आणि टिळक दोघेही बुद्धिमान, चारित्र्यसंपन्न आणि विचारी होते. दोघांच्याही बुद्धीला विलक्षण धार होती. भारत देशाचा इतिहास संपन्न, संस्कृती महान तरीही आम्ही परकियांचे गुलाम का, आमचा समाज मागे का, भारताला या निकृष्ट अवस्थेतून बाहेर कसे काढता येईल ?याचा विचार ते करू लागले .आपल्या देशबांधवांचे अज्ञान दूर केल्याशिवाय आपल्या समाजाची प्रगती होणार नाही. त्यासाठी लोकांना शिक्षण दिलं पाहिजे .त्यांच्यावर नव्या विचारांचा प्रभाव पाडला पाहिजे .त्यांना जागा केलं पाहिजे. लोक जागृतीच्या कार्यासाठी सार आयुष्य खर्च करण्याचा त्या दोघांनी निश्चय केला.

त्याकाळी अशाच विचारांनी भरलेल्या एका व्यक्तीशी दोघांची भेट झाली. ती व्यक्ती म्हणजे विष्णुशास्त्री चिपळूणकर .चिपळूणकर जबरदस्त ताकदीचे लेखक होते.' मराठी भाषेचे शिवाजी' म्हणून ते ओळखले जातात. जसं त्यांचं भाषेवर प्रभुत्व तसंच या देशावर निस्सीम प्रेम होत. भारतीयांचा आत्मविश्वास त्यांनी जागा केला . चिपळूणकरांना इंग्रजांची सत्ता मुळीच मान्य नव्हती. पाश्चात्य विद्येबद्दल मात्र आदर होता. त्या विद्येतील वैज्ञानिक दृष्टी, तंत्रज्ञान ,स्वातंत्र्य इत्यादी विचारांनी ते प्रभावीत झाले होते .त्यांनी पुण्यात न्यू इंग्लिश स्कूल सुरू केलं आणि पुढं फर्गसन कॉलेज काढलं टिळकांच्या समाजकार्यास अशा प्रकारे सुरुवात झाली.


शिक्षण संस्थेप्रमाणे लोक-शिक्षणाचे दुसरे प्रभावी साधन म्हणजे वर्तमानपत्र .टिळक आगरकरांनी मराठी भाषेत ' केसरी ' आणि इंग्रजी भाषेत ' मराठा ' अशी दोन वर्तमानपत्रे सुरू केली. वर्तमानपत्रातून जिथे अन्याय , भ्रष्टाचार दिसेल तिथे ते जबरदस्त प्रहार करीत असत. अन्यायापोटी टिळकांनी कोल्हापूर संस्थानचे दिवाण माधवराव बर्वे यांच्यावर चौफेर हल्ला चढवला. बर्वे कोर्टात गेले .कोर्टात टिळक आगरकरांना अब्रू नुकसानीच्या खटल्यात दोषी ठरवलं .दोघांना 101 दिवसांचा तुरुंगवास झाला. लोककार्यासाठी तुरुंगात जाणारे टिळक आणि आगरकर हे पहिले संपादक होते .तथापि टिळक व आगरकर सुटून आले तेव्हा आम जनतेने त्यांचा सत्कार केला .विशेष म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले यांनी त्यांचं कौतुक केलं .टिळकांनी केसरीतून लोकांची राजकीय जागृती करण्याचा चंग बांधला. त्यासाठी त्यांनी ' शिवजयंती" गणेशोत्सव ' हे दोन सार्वजनिक उत्सव साजरे करण्याची प्रथा सुरू केली. एकीकडे केसरीच्या गर्जना आणि दुसऱ्या बाजूने या उत्सवातील देशभक्तीपर व्याख्याने व राष्ट्र प्रेमाची गाणी यांनी समाज खळबळून जागा होऊ लागला. एका अर्थाने नव्या युगाचे वारे वाहू लागले होते.

एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस दुष्काळाप्रमाणेच प्लेगनेदेखील महाराष्ट्रात थैमान घातलं होतं .हजारो लोक मृत्युमुखी पडत होते. त्यावेळी टिळकांनी गावोगाव जाऊन रोगी लोकाच्या छावण्यांची पाहणी केली. सरकारला सूचना केल्या. लोकांनी आधुनिक वैद्यकीय ज्ञानाचा फायदा घ्यावा, असा सल्ला दिला. पुण्यात ही प्लेग ने कहर माजवला .hसरकारने या विरुद्ध उपाययोजना करण्यासाठी रँड नावाच्या अधिकाऱ्याची नेमणूक केली. रँडचे अधिकारी आणि शिपाई घराघरात शिरून रोगी शोधत असत . तसे करत असताना त्यांनी लोकांचे रीतीरिवाज, धर्मकल्पना यांचा विचार केला नाही .परिणामी जुलूमशाहीने संतापलेल्या चाफेकर बंधूंनी गोळ्या घालून रँड ची हत्या केली .त्यामुळे सरकार बिथरले .धरपकड सुरू झाली. टिळकांनी रँडच्या वधाचा निषेध केला. त्याचबरोबर सरकारी अत्याचारांचाही धिक्कार केला .'सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?' असा स्पष्ट सवाल लोकमान्य टिळकांनी केसरीच्या अग्रलेखातून विचारला. आधीच बिथरलेल्या सरकारने लोकमान्यांवर खटला भरला. टिळकांना दीड वर्षांची सक्त मजुरीची सजा झाली. सारा भारत हादरला आणि संतापलाही. लोकांच्या मनातील सरकारची आणि तुरुंगातील भीती कमी झाली. पुढच्या काळात तर तुरुंग हे भारतीय स्वातंत्र्य सैनिकांचं जणू पवित्र स्थान झालं आणि स्वार्थ त्यागाच्या एका महान परंपरेला सुरुवात झाली.

वाढत्या राष्ट्रवादाला आळा घालण्यासाठी 1905 आली इंग्रजांनी बंगालची फाळणी केली .सारा बंगाल संतापून उठला .' वंदे मातरम' च्या गजरान आसमंत दणाणला .अशावेळी अन्या याविरुद्ध लढा दिला पाहिजे, असा संदेश टिळकांनी दिला. तसेच लढ्याला सूत्रबद्धता यावी म्हणून स्वराज्य, स्वदेशी, बहिष्कार आणि राष्ट्रीय शिक्षण असा चतु:सूत्री कार्यक्रम आखला . ठाई ठाई परदेशी मालाच्या होळ्या झाल्या . लोकांनी स्वदेशी माल वापरण्याच्या आणि परदेशी मालावर बहिष्कार टाकण्याच्या शपथा घेतल्या. गावोगावी राष्ट्रीय शाळा उघडण्यात आल्या .साऱ्या देशभर असंतोषाचा डोंब उसळला .या असंतोषाचे जनक लोकमान्य बाळ गंगाधर टिळक हेच आहेत याविषयी सरकारला खात्री होती, म्हणून सरकारने टिळकांवर राजद्रोहाचा खटला भरला .1908 ला टिळकांना सहा वर्षांची शिक्षा ठोठावण्यात आली. तरीही एखाद्या योगी प्रमाणे टिळक अविचल होते .आपल्या सहा वर्षांच्या मंडालेच्या बंदीवासात त्यांनी ' गीतारहस्य' हा भगवद्गीते वरचा विद्वत्ता पूर्ण ग्रंथ लिहिला .1914 साली टिळक मंडाले हून सुटून परत आले. सारा देश आनंदाने बेहोश झाला .देशात उत्साहाचे वारे पुन्हा वाहू लागले .लोकमान्य टिळकांनी ॲनी बेझंट यांच्याबरोबर होमरूल चळवळ सुरू केली. होमरूल म्हणजे आपल्या देशाचा कारभार आपण स्वतः पाहण होय. स्वराज्यअर्थात होमरूल चा प्रसार करण्यासाठी टिळक गावोगावी हिंडले. ' स्वराज्य माझा जन्मसिद्ध का आहे आणि तो मी मिळवणारच' अशी स्फूर्ती दाई घोषणा त्यांनी केली .त्यांना सर्व स्तरातून पाठिंबा मिळाला. या संग्रामात हिंदू मुस्लिमांची एकजूट बळकट व्हावी, या हेतूने 1916 साली त्यांनी एक करार घडवून आणला तो' लखनऊ करार ' म्हणून ओळखला जातो.

अशाप्रकारे लोकमान्य टिळकांचं कार्यक्षेत्र केवळ राजकारणापुरतं मर्यादित नव्हतं .त्यांचं व्यक्तिमत्व अनेक दिशांनी फुललेलं होतं. एक विवेकनिष्ठ विचारी तत्त्वज्ञ म्हणून देखील त्यांची ख्याती होती .' गीतारहस्य ' प्रमाणेच त्यांनी ' ओरायन' ' आर्क्टिक होम ऑफ द वेदाज' हे विद्वत्ता पूर्ण ग्रंथ लिहिले. तसेच खगोलशास्त्राच्या मदतीने त्यांनी एक शास्त्रशुद्ध पंचांग तयार केलं. आयुष्यभरात त्यांनी खूप कार्य केले.अखेर दिनांक 1 ऑगस्ट 1920 रोजी मुंबईला त्यांचे देहावसान झाले .टिळक युगाचा अस्त झाला.त्यांचे जीवन कृतार्थ झाले.

धन्य ते लोकमान्य टिळक!



डॉ. आनंदराव सूर्यवंशी

# आज उल्हासनगर मनपा क्षेत्रात पाणी पुरवठा बंद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता / उल्हासनगर : महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (MIDC) शहाड पंपीग स्टेशन व जलशुद्धीकरण केंद्रातील महत्त्वाच्या साप्ताहिक देखभाल व दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे. त्यामुळे शुक्रवार दिनांक 01 ऑगस्ट 2025 रोजी स. बारा वाजले पासून ते संध्याकाळी चार वाजेपर्यंत (4 तासाकरिता) जुना व नवीन मुख्य संतुलन जलकुंभातून होणारा पाणीपुरवठा बंद राहील. तसेच देखभाल दुरुस्ती कामा नंतर MIDC कडून पाणीपुरवठा कमी दाबाने होण्याची शक्यता आहे. कृपया संबंधितांनी याची नोंद घ्यावी.

# अवयव दान सप्ताहा निमित्त जिल्हा परिषदेकडून जनजागृती

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : "अवयव दान सप्ताह" (Organ Donation Week) निमित्ताने जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाच्या वतीने जनजागृतीसाठी विविध उपक्रम दि. ३ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट पर्यत आयोजन करण्यात आले आहे. अवयव दानाचे महत्त्व पटवून देण्यासाठी शैक्षणिक सत्रे, चर्चासत्र, जनजागृती रॅली, पोस्टर प्रदर्शन व वैद्यकीय मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येणार आहेत. या उपक्रमांचा उद्देश म्हणजे समाजात अवयव दानाविषयी सकारात्मक विचारसरणी निर्माण करणे आणि गरजू रुग्णांना जीवनदान मिळवून देण्यासाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग मिळवणे.

दरवर्षी हजारो रुग्ण किडनी, लिव्हर, हृदय, फुफ्फुसे इत्यादी अवयवांच्या प्रत्यारोपणासाठी प्रतीक्षा यादीत राहतात. एका व्यक्तीच्या अवयव दानाने आठ जणांपर्यंतचे प्राण वाचू शकतात, त्यामुळे अवयव दान ही केवळ वैद्यकीय प्रक्रिया नसून, ती एक श्रेष्ठ सामाजिक आणि मानवी मूल्यांची अभिव्यक्ती आहे.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी यावेळी सांगितले की, "मृत्यूनंतर अवयव दान करून आपण अनेक जिवांना पुन्हा नवसंजीवनी देऊ शकतो. प्रत्येक नागरिकाने अवयव दानाचा निर्णय घेऊन कुटुंबासोबत या विषयी संवाद साधावा."

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी सांगितले की, "अवयव दान ही एक संवेदनशील आणि सशक्त सामाजिक जबाबदारी आहे. वैद्यकीय दृष्टिकोनातून पाहता, वेळेवर मिळालेला अवयव एखाद्या रुग्णासाठी जीवन वाचवू शकतो. त्यामुळे नागरिकांनी अवयव दानासंदर्भात भीती किंवा गैरसमज बाजूला ठेवून माहितीपूर्ण निर्णय घ्यावा."

सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, अवयव दान ही आपल्या इच्छेने आणि जागरूकतेने घ्यायची सामाजिक जबाबदारी आहे. आपण स्वतः पुढाकार घेतल्यास आपल्या कृतीमधून इतरांनाही प्रेरणा मिळू शकते. आरोग्य विभागाच्या वतीने सर्व शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था आणि वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधींनी यामध्ये सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

# आजचे राशि भविष्य



**मेष**
अभ्यास आणि अध्यापनाशी संबंधित लोकांसाठी आजचा दिवस चांगला आहे. तुम्हाला लवकरच मोठे यश मिळणार आहे.कौटुंबिक जीवन आनंदी राहील.

**वृषभ**
आजचा दिवस आनंदात व्यतीत कराल. तुम्हाला तुमच्या मुलाकडून एखादी चांगली बातमी मिळेल. तुमचे मन प्रसन्न राहील. शैक्षणिक कार्यात यश मिळेल.

**मिथुन**
संबंधित प्रवास करावा लागेल. तुम्हाला काही अनुभवी लोक भेटतील. ज्यामुळे तुम्हाला भविष्यात फायदा होईल. व्यवसायात चांगला नफा मिळेल.

**कर्क**
तुम्ही आणि तुमचे कुटुंब खूप आनंदी व्हाल.अनावश्यक खर्च टाळावा.कामाच्या ठिकाणी काही नवीन कल्पना आणाल. सकारात्मक वृत्तीमुळेच नोकरीत बढती मिळेल.

**सिंह**
व्यावसायिकांसाठी दिवस चांगला आहे.या काळात तुम्ही तुमचे आरोग्य सुधारण्याचा प्रयत्न कराल.नोकरीत पदोन्नती तसेच उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता आहे.

**कन्या**
मान-सन्मान वाढेल. कामाच्या ठिकाणी अधिकाऱ्यांशी सुसंवाद राखाल. प्रगतीच्या संधी मिळतील. कठोर परिश्रम कठीण परिस्थितीतून बाहेर पडाल.

**तूळ**
कार्यालयात सहकाऱ्यांशी चांगला समन्वय राहील. वरिष्ठ तुमच्या कामावर खूश होतील. तुम्हाला बढती मिळण्याची शक्यता आहे. तुमचा पगारही वाढू शकतो.

**वृश्चिक**
अपेक्षेपेक्षा जास्त लाभ होण्याची शक्यता आहे.तुम्ही बांधकाम व्यवसायात गुंतलेले असाल तर तुमच्यासाठी फायद्याची शक्यता आहे .

**धनु**
तुमचे कौटुंबिक जीवन खूप आनंददायी असणार आहे. तुमचे ध्येय साध्य करण्यासाठी तुम्ही तयार असाल. तुमच्या वैवाहिक जीवनात सुंदर समन्वय राहील.

**मकर**
पैशाच्या व्यवहारात थोडे सावध राहा. तुमचे वैवाहिक जीवन चांगले राहील. काही खेळांमध्ये भाग घेऊ शकता. व्यवसाय करणाऱ्यांना सुवर्णसंधी मिळेल. व्यवसायाशी

**कुंभ**
कामाच्या ठिकाणी शहाणपणाने घेतलेले निर्णय चांगले परिणाम देतील.जुन्या जमिनीच्या मालमत्तेतून तुम्हाला चांगला नफा मिळेल. सरकारी क्षेत्रात नोकरी मिळेल.

**मीन**
वैवाहिक संबंध मजबूत करण्यासाठी तुम्ही तुमच्या जोडीदाराला भेटवस्तू द्याल. या काळात तुम्ही नकारात्मक विचार टाळले पाहिजेत.






# जिल्हा परिषदेच्या वतीने जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या सेवापूर्ती निमित्त गौरव सोहळा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**दि. ३०** – जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी, ठाणे अशोक शिनगारे यांच्या सेवापूर्ती निमित्त जिल्हा परिषद ठाणे यांच्यातर्फे जिल्हा परिषद कार्यालय ठाणे येथे गौरव समारंभाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्हा परिषदेचे अधिकारी, विभागप्रमुख व कर्मचारी यांनी उपस्थित राहून आपल्या स्नेहपूर्ण भावना आणि कृतज्ञता व्यक्त केली.

कार्यक्रमाच्या प्रारंभी अशोक शिनगारे व त्यांच्या पत्नी स्मिता शिनगारे यांचे स्वागत जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, आणि जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांच्या हस्ते करण्यात आले.

यानंतर उपमुख्य कार्यकारी अधिकारी अविनाश फडतरे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक सादर करत जिल्हाधिकारी यांच्या ठाणे जिल्ह्यातील कार्यकाळातील नेतृत्व, प्रभावी धोरण राबविणे व सर्वांगीण प्रशासनिक कार्यक्षमता याबद्दल गौरवोद्गार व्यक्त केले.

या प्रसंगी ठाणे जिल्ह्यातील प्रशासनाच्या विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्यांचा मागोवा घेणारी एक विशेष चित्रफीत व छायाचित्र सादरीकरण करण्यात आले, ज्यात जिल्हाधिकारी शिनगारे यांच्या कार्यकाळातील विविध महत्त्वपूर्ण योजना, उपक्रम व क्रियाशील सहभाग यांचे दर्शन घडवले.

या प्रसंगी मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी त्यांचे मनोगतातुन अत्यंत भावूकपुर्ण रितीने प्रशासनात काम करताना जिल्हाधिकारी यांनी सर्व अधिकारी वर्गासोबत जिव्हाळयाने तसेच




आपुलकीने कामकाज करून सर्व अधिकारी-कर्मचारी यांना मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन केल्याबद्दल आभार व्यक्त केले व पुढील वाटचालीसाठी सदिच्छा दिल्या.

यानंतर जिल्हा परिषदेतील विविध अधिकारी वर्गाच्या वतीने मनोगत सत्रात प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे, तसेच विविध विभागप्रमुख यांनी मनोगत व्यक्त केले, जिल्हाधिकारी यांच्या सहकार्यपूर्ण, मार्गदर्शक व प्रेरणादायी नेतृत्वाचे कौतुक केले. यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या हस्ते जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांचा सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

मनोगत व्यक्त करताना अशोक शिनगारे यांनी आपल्या सेवाविषयक अनुभवांवर प्रकाश टाकला. त्यांनी ठाणे जिल्ह्याशी निर्माण झालेल्या आत्मीयतेच्या नात्याचा भावनिक उल्लेख करत जिल्हा परिषदेच्या सर्व सहकाऱ्यांचे, अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे विशेष आभार मानले. जिल्ह्याच्या प्रगतीमध्ये सर्वांनी दिलेल्या सहकार्यामुळेच शासकीय कामकाज प्रभावीपणे राबवता आल्या, असे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत) प्रमोद काळे यांनी मान्यवरांचे व उपस्थितांचे आभार मानण्यात आले. या समारंभाने एक कर्तव्यनिष्ठ, दूरदृष्टीसंपन्न व लोकाभिमुख प्रशासकीय अधिकारी यांच्या सेवेला सन्मानपूर्वक निरोप देण्याची संधी जिल्हा परिषदेला मिळाली. जिल्हा परिषदेचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.

# समावेशित शिक्षणासाठी सिव्हिल रुग्णालयात विशेष वैद्यकीय शिबीर

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ला पाच वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने "अखिल भारतीय शिक्षा समागम सप्ताह" साजरा केला जात आहे. या निमित्ताने समग्र शिक्षा – समावेशित शिक्षण उपक्रम, शिक्षण विभाग, जिल्हा परिषद ठाणे आणि राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम, जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २९ जुलै, २०२५ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय ठाणे येथे विशेष वैद्यकीय तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरात अस्थिव्यंग, वाचादोष, कर्णदोष, दृष्टीदोष, मतिमंद, बहुविकलांग अशा विविध प्रकारच्या विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी व मूल्यांकन करण्यात आले. हे शिबिर केवळ तपासणीसाठी न राहता, मुलांच्या विशिष्ट गरजांचे अचूक आकलन करून त्यांना सहाय्यक उपकरणे, उपचार, लवकर हस्तक्षेप सेवा आणि घर आधारित शिक्षण यांशी जोडण्याच्या उद्देशाने राबवण्यात आले.

कार्यक्रमास शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. धीरज महागडे, तसेच महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई येथील रूपाली सावंत, ऋत्विक, सताक्षी यांनी उपस्थिती दर्शवली. त्यांनी विद्यार्थ्यांशी, पालकांशी आणि उपस्थित वैद्यकीय अधिकारी व शिक्षकीय कर्मचाऱ्यांशी संवाद साधला.

या शिबिरात ५० विशेष गरजाधारक विद्यार्थी, ५५ पालक, ९ विशेष शिक्षक, ४ विशेष तज्ज्ञ व जिल्हा समन्वयक सहभागी झाले होते. अंध, दृष्टीदोष, कर्णदोष, वाचादोष, बौद्धिक अक्षम व अस्थिव्यंग प्रवर्गातील विद्यार्थ्यांचा यामध्ये समावेश होता.

या उपक्रमाचे समन्वयक म्हणून अनिल कुऱ्हाडे, भरत वेखंडे, अरुणा पाटील (समावेशित शिक्षण – जिल्हा समन्वयक, जिल्हा परिषद ठाणे), विनोद जोशी, रोशन पाटील (जिल्हा कार्यक्रम समन्वयक – राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम) यांचे विशेष योगदान लाभले. भिवंडी व कल्याण गटातील विशेष शिक्षक व तज्ज्ञांनी शिबिराच्या आयोजनात मोलाची भूमिका बजावली.

कार्यक्रमास मुख्य मार्गदर्शक म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. कैलास पवार यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, मुरबाड व शहापूर गटांतील विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी दि. 31 जुलै 2025रोजी तसेच 1, 2 व 4 ऑगस्ट 2025 रोजी वैद्यकीय तपासणी शिबिरांचे आयोजन जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे येथे करण्यात आले आहे.

शिक्षण विभाग आणि आरोग्य विभागाच्या संयुक्त पुढाकारामुळे शैक्षणिक समावेशासाठी गरज असलेल्या विद्यार्थ्यांना वैद्यकीय सेवा थेट त्यांच्या दारापर्यंत पोहोचवण्याचा एक महत्त्वपूर्ण प्रयत्न यशस्वी ठरत आहे.

# कल्याण डोंबिवलीतील २७ गावातील कर्मचाऱ्यांच्या संघर्षाला यश

## १५ ऑगस्टला मिळणार नियुक्ती पत्र

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण :** कल्याण- डोंबिवली महापालिकेत समाविष्ट करण्यात आलेल्या २७ गावातील कामगार मागील दहा वर्षापासून पालिकेच्या सेवेत कार्यरत होते. शासनाने कायम करण्याबाबत आदेश दिल्यानंतर देखील त्यांची नियुक्ती करण्यात येत नव्हती. अखेर या कर्मचाऱ्यांच्या लढ्याला यश मिळाले असून या सर्व कर्मचाऱ्यांना केडीएमसीकडून १५ ऑगस्टला नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे.

कल्याण-डोंबिवली महापालिके अंतर्गत असलेल्या २७ गावातील या कामगारांना कायम करण्याबाबत राज्य शासनाने आदेशित केले आहे. तरीही या कामगारांची प्रतीक्षा कायम होती. मात्र आता प्रशासनाकडून कामगारांची पोलीस पडताळणी आणि आरोग्य तपासणी पूर्ण होताच, या कामगारांना टप्प्याटप्प्याने नियुक्ती पत्र दिली जाती. यातील पहिल्या टप्प्यातील नियुक्तीपत्र १५ ऑगस्टला देणार असल्याचे आश्वासन केडीएमसीचे आयुक्त अभिनव गोयल यांनी आमदार राजेश मोरे यांना दिले. आज आमदार मोरे यांनी विविध विषयावर पालिका आयुक्तांची भेट घेत सकारात्मक चर्चा केली.

ग्रामीण भागात चालविणार बस

ग्रामीण भागात दळणवळणाच्या सुविधा नसल्याने विद्यार्थ्यांचे हाल होत असून या गावातून शाळेच्या वेळामध्ये बस सुविधा सुरु करण्याची मागणी मान्य करत कामगार आणि बसेस कमी असल्या तरीही काही प्रमाणात या मार्गावर बसेस चालविण्याचे आश्वासन प्रशासनाने दिले. तसेच ग्रामीण भागात सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबरोबरच स्मार्ट सिटीमधील बंद असलेले कॅमेरे सुरु करावेत, गावामध्ये पथदिवे बसवावेत. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे दवाखाने आणि हेल्थ सेंटर सुरु करावेत.

**यावरही करणार तातडीने कारवाई**

त्याचप्रमाणे सणाचा पार्श्वभूमीवर रस्त्यावरील खड्डे तातडीने बुजवावेत, मंडपासह कमानी शुल्क देखील माफ करावे, ग्रामीण भागातील पाणी पुरवठ्याचे प्रश्न तातडीने सोडवावेत, अमृतच्या जलकुंभाचे काम पूर्ण करत या जलकुंभातून पाणी पुरवठा सुरु करावा, ग्रामीण भागातील भूयारी गटारांची कामे सुरु करावीत, डोंबिवली स्थानक परिसरातील चिमणी गल्लीतील पार्किंग तातडीने सुरु करण्याची मागणी आमदार मोरे यांनी केली.

दरम्यान याबाबत तातडीने कारवाई करण्याचे आश्वासन आयुक्तांनी आमदारांना दिले. त्याच बरोबर पाणी पुरवठा सुरळीत करण्यासाठी एमआयडीसीच्या अधिकाऱ्याबरोबर बैठक घेण्याचे आश्वासन आयुक्तांनी दिले.


# डोंबिवलीत बेकायदा बांधकामावर हातोडा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**डोंबिवली, ता. ३१ :** डोंबिवली पश्चिमेतील ह प्रभाग क्षेत्रातील कुंभारखाणपाडा, सरोवरनगर येथील बेकायदा चाळीवर सहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांच्या तोडकाम पथकाने हातोडा चालवला. भरपावसात ही कारवाई केली असून, याआधीदेखील याच परिसरात भूमाफियांनी बेकायदा बांधकाम केली होती. डोंबिवली पश्चिमेला खाडीकिनारी परिसरात भूमाफिया बेकायदा बांधकाम उभारत आहेत. चाळीचे बांधकाम मोठ्या प्रमाणात होत आहे.

पावसाळ्यात अधिकाऱ्यांचे लक्ष नाही, असा विचार करून भूमाफियांनी कुंभारखाणपाडा, सरोवरनगर खाडीकिनारा परिसरात खासगी, सरकारी जमिनींवर बेकायदा चाळी उभारण्याचा सपाटा लावला होता. या चाळींच्या ठिकाणी पोहोच रस्ते नाहीत. पाणीपुरवठा, मलनिस्सारणाची कोणतीही सुविधा नसताना या चाळींची उभारणी केली होती. प्रभागात फिरत असताना सहाय्यक आयुक्त राजेश सावंत यांना या भागात नव्याने बेकायदा चाळी उभारल्या जात असल्याचे निदर्शनास आले. त्यांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली. १० खोल्यांच्या या चाळी बेकायदा असल्याची खात्री पटल्यावर आवश्यक विहित प्रक्रिया पार पाडून सहाय्यक आयुक्त सावंत, अधीक्षक अरूण पाटील यांनी तोडकाम पथक, जेसीबीच्या सहाय्याने सरोवरनगर, कुंभारखाणपाडा भागातील बेकायदा चाळी भुईसपाट केल्या.

# वसई विरार पालिका आयुक्तांनी केली गोखीवरे कचराभूमीची पाहणी



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**विरार :** वसई विरार पालिकेचे नवनिर्वाचित आयुक्त मनोजकुमार सूर्यवंशी यांनी बुधवारी गोखीवरे येथील कचराभूमीची पाहणी केली. यावेळी त्यांनी तिथे उपस्थित असणाऱ्या स्वच्छता निरीक्षक आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. तसेच शहरात स्वच्छतेला प्राधान्य देण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत.


पालिका क्षेत्रात दररोज संकलित होणाऱ्या कचऱ्याची प्रभावी विल्हेवाट लावली जावी तसेच अनेक काळापासून प्रक्रियेविना पडून असलेल्या कचऱ्याची पाहणी त्यांनी यावेळी केली. काही काळापासून पडून असलेल्या कचऱ्याची विल्हेवाट तातडीने लावण्याचे आदेश त्यांनी यावेळी दिले. तसेच ही प्रक्रिया नव्या आधुनिक यंत्रणाचा वापर करून पर्यावरणपूरक करावी अशा सूचनाही त्यांनी यावेळी केल्या.

स्वच्छता आणि पर्यावरण रक्षणावर भर शहरातील स्वच्छता आणि पर्यावरणाचे संरक्षणाबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही असेही त्यांनी स्पष्ट केले. यावेळी पालिकेचे स्वच्छता निरीक्षक तसेच इतर अधिकारी उपस्थित होते. यामुळे आता स्वच्छतेच्या प्रश्नाबाबत बाबत पालिकेकडून कार्यवाही केली जात असून यामुळे शहरातील स्वच्छता सुधारण्यास मदत होणार आहे.

# केडीएमटीचे बस थांबे रिक्षा आणि गर्दुल्ल्यांच्या विळख्यात

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** - कल्याण डोंबिवली शहरांतर्गत कल्याण डोंबिवली परिवहन सेवेच्या बस दिलेल्या वेळेत धावत नसल्याने, या बसवर अवलंबून असलेले प्रवासी बहुतांशी केडीएमटीच्या बस थांब्यावर थांबत नाहीत. अनेक प्रवासी रिक्षा, इतर वाहनांनी इच्छित स्थळाचा प्रवास करतात. त्यामुळे केडीएमटीच्या बस थांब्यावर बसची वाट पाहत प्रवासी थांबत नसल्याने शहराच्या विविध भागात आकर्षक सजावटीचे केडीएमटीचे बस थांबे भटके श्वान, गर्दुल्ले आणि वाहनांच्या विळख्यात अडकले आहेत.



कल्याण डोंबिवली पालिका परिवहन उपक्रमाने लाखो रूपये खर्च करून कल्याण, डोंबिवली, टिटवाळा शहरांमध्ये बस थांबे उभारले आहेत. जुने बस थांबे चांगले असताना नवीन बस थांबे बसवायचे आहेत, असे सांगून दोन ते तीन वर्षापूर्वी शहरात स्टीलचे आकर्षक बस थांबे उभारण्यात आले. हे बस थांबे फक्त बस चालकासाठी बस थांब्याचा इशारा म्हणून उभे करण्यात आले आहेत. या बस थांब्यात उभे राहिले की पाऊस, उन अंगावर येते. कोणत्याही प्रकारचा निवारा या बस थांब्याच्या माध्यमातून मिळत नाही, असे प्रवासी सांगतात.

काही ठिकाणी या बस थांब्याच्या खाली उंदरांनी उकिरडे काढले आहेत. काही ठिकाणी भिकारी, गर्दुल्ले आपले सामान त्या ठिकाणी ठेवतात. काही ठिकाणी भंगार विक्रेते आडोसा म्हणून या बस थांब्यांचा वापर करत आहेत. केडीएमटीचे तिकीट निरीक्षक शहर परिसरात फिरताना दिसत नाहीत त्यामुळे बस थांब्याची असलेली अवस्था प्रशासनाला कळत नसल्याचे समजते. यापूर्वीचे केडीएमटीचे साहाय्यक आगार व्यवस्थापक संदीप भोसले आठवड्यातून दोन ते तीन वेळा शहराच्या विविध भागात बस थांबे, परिवहन मार्ग यांची पाहणी करत होते. तिकीट तपासणीस नियमित तिकीट तपासणी करतात की नाही याचा आढावा घेत होते. हे प्रकार आता थंडावले असल्याची कर्मचाऱ्यांची चर्चा आहे.

डोंबिवली पूर्वेत पाथर्ली शेलार नाका भागात मुख्य वर्दळीच्या चौकात रस्त्याच्या दुतर्फा रिक्षा, टेम्पो उभे असतात. या भागातील केडीएमटीचा बस थांबा समोरील बाजुने पूर्णपणे वाहनांच्या विळख्याने झाकला गेला आहे. बस थांबा आणि बाजुच्या रिक्षा, इतर वाहनांमध्ये या भागात रात्रीच्या वेळेत गैरप्रकार चालतात, अशा तक्रारी आहेत. केडीएमटीचे बस थांबे प्रवाशांसाठी सुस्थितीत आहेत का याचा आढावा एकदा कल्याण डोंबिवली पालिका परिवहन उपक्रमाच्या अधिकाऱ्यांनी घेण्याची मागणी प्रवाशांकडून करण्यात येत आहे.

# मच्छिमारांनी सरकारच्या डिझेल कोट्याची प्रतीक्षा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

उरण : १ ऑगस्ट पासून मासेमारीचा नवा हंगाम सुरू होत आहे. त्यामुळे उरणच्या करंजा, मोरा तसेच अनेक बंदरावर मच्छिमारांची लगबग सुरू झाली आहे. मात्र मासेमारी करण्यासाठी लागणारा डिझेल (तेल) अनुदान मिळण्यासाठी मत्स्यव्यवसाय विभागाकडून परवानगी मिळण्याची प्रतीक्षा आहे. जो पर्यंत मत्स्यविभागच्या आयुक्तांकडून परवानगी मिळत नाही तो पर्यंत मासेमारी बोटी समुद्रात उतरता येणार नाहीत. तर गेल्या काही महिन्यातील सरकार कडून मिळणाऱ्या तेल (डिझेल) कोट्याची प्रतीक्षा कायम आहे. त्यामुळे हजारो मच्छिमारांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत आहे. हा कोटा सरकारने लवकरात लवकर मंजूर करावा अशी मागणी मच्छिमारांनी शासनाकडे केली आहे.

मासेमारी करणाऱ्यांना शासनाकडून मासेमारीसाठी वापरण्यात येणाऱ्या बोटींना वर्षाकाठी ३५ हजार लिटर डिझेल दिले जाते. या डिझेलवर शासनाकडून डिझेल वरील वॅट किंवा लिटर मागे १८ रुपयांची सूट दिली जात आहे. यालाच मच्छिमार डिझेल परतावा असे म्हणतात. हे तेलावरील अनुदान शासनाच्या मत्स्यविभागाने त्याचा कोटा मंजूर केल्या शिवाय मिळत नाही. त्यामुळे महिनाभरा पासून मच्छिमारांना या कोट्याविना मासेमारी करावी लागत आहे. तर मागील दोन ते तीन महिन्याचे डिझेल वरील परतावे ही थकले आहेत. याचा परिणाम मासेमारीच्या नव्या हंगामावर होण्याची शक्यता आहे.

शासनाने पावसाळ्यात दोन घातलेली खोल समुद्रातील मासेमारी बंदी उठविण्यात आली आहे. त्यामुळे १ ऑगस्ट पासून मासेमारी सुरू झाली आहे. यात प्रामुख्याने नारळी पौर्णिमेनंतर समुद्र शांत झाल्याने मासेमारी जोमाने सुरू झाली आहे. गेल्या वर्षी पासून १५ ऑगस्ट मध्ये मुंबईतील ससून डॉक ऐवजी उरणच्या करंजा बंदरात सुरू झालेल्या मासळी बाजार सुरु झाला आहे. त्यामुळे बंदी उठाताच खरेदीसाठी मोठी गर्दी होऊ लागली आहे. तर, स्वस्त दरात मासळी खरेदी करण्यासाठी मुंबई, कल्याण, अलिबाग, ठाणे येथील व्यावसायिक आणि स्थानिक रहिवासी हे करंजा बंदरात येत आहेत.

उरण तालुक्यातील किनारपट्टीवरील करंजा, मोरा, दिघोडे, आवरे परिसरात मोठ्या प्रमाणात खोल समुद्रातील मासेमारी करण्यात येत आहे. यामध्ये, सुमारे ७०० पेक्षा अधिक मासेमारी बोटी असून मासळीची खरेदी-विक्री करण्यासाठी त्यांना मुंबईतील ससूनडॉक आणि भाऊचा धक्का येथे जावे लागत होते. दरम्यान, राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून ६०० मीटर लांबीचे 'फिशिंग- डॉक' करंजा येथे उभारण्यात आले आहे. यामध्ये, मासेमारी बोटीतील मासळी बंदरात उतरवून त्याच्या खरेदीविक्रीला सुरुवात करण्यात आली आहे. यामुळे, नव्याने सुरू झालेल्या 'करंजा - द्रोणागिरी मत्स्य व्यवसाय बंदर' येथे अनेक व्यापारी आणि स्थानिक रहिवासी हे घाऊक आणि दैनंदिन गरजेसाठी आवश्यक मासळी खरेदी करण्यासाठी गर्दी करू लागले आहेत.

## एका फेरीसाठी 4 लाखांचा खर्च :

मासेमारी करण्यासाठी जाणाऱ्या एका बोटीसाठी किमान ४ लाख रुपये खर्च येतो. यात सर्वात अधिक खर्च हा डिझेलचा असतो. अशी माहिती करंजा येथील मच्छिमार नेते रमेश नाखवा यांनी दिली आहे. निम्मा निम्मा नफा बोट मालक आणि बोटीवर काम करणारे खलाशी व चालक तांडेल यांच्यात खर्च जाऊन मिळणाऱ्या नफ्याचा निम्मा निम्मा वाटा हा समान वाटण्यात येतो.



# पालघर जिल्ह्यात 'शाळा तिथे दाखला' मोहीम

## जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांची संकल्पना

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पालघर :** पालघर जिल्हायामध्ये महसूल सप्ताह अंतर्गत पालघर जिल्हयाच्या जिल्हाधिकारी डॉ. इंदु राणी जाखड यांच्या संकल्पनेतून महत्वाकांक्षी अश्या "शाळा तिथे दाखला" या मोहीमेअंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक असलेले विविध दाखले शालेय स्तरावर वितरीत करण्याचे नियोजन असून याअंतर्गत एकूण ७१ हजार विद्यार्थ्यांना दाखले वितरीत करण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणविस व महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून महसूल विभागाकडून जनतेसाठी देण्यात येणाऱ्या सेवा व विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना विषयी राज्यातील नागरीकांना माहिती प्राप्त होऊन त्याचा योग्य लाभ घेता यावा तसेच शासनाच्या विविध योजना यशस्वीपणे राबविणाऱ्या व महसूल प्रशासनात

**या कार्यक्रमाअंतर्गत २०११ च्या पूर्वीपासून शासकीय जमिनीवर असलेली अतिक्रमणे नियमानुकूल करणे, पाणंद, शिवरस्त्यांची मोजणी करुन दुतर्फा वृक्षलागवड करणे, विशेष सहाय्य योजनेतील लाभार्थ्यांचे आधार कार्ड व केवायसी न झाल्यामुळे अप्राप्त अनुदान घरभेटी करुन वाटप करणे, तसेच 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियाना अंतर्गत' मंडळ निहाय अभियांन राबविण्यात येत असून प्रलबित असलेले वारस नोंद व इतर फेरफार करण्यात येणार आहेत.**

उत्कृष्टपणे काम करणाऱ्या कर्मचारी अधिकाऱ्यांच्या पाठीवर शाबासकीची थाप मिळावी यासाठी राज्यात महसूल विभागामार्फत १ ते ७ ऑगस्ट या कालावधीत 'महसूल सप्ताह-2025' साजरा करण्यात येत आहे.



महसूल सप्ताह अंतर्गत 7 दिवसात प्रत्येक दिवशी जनतेच्या हिताचे विविध कार्यक्रम घेणेत येत आहेत. १ ऑगस्ट रोजी "महसूल दिन साजरा करणे व महसूल सप्ताह शुभारंभ होणार असून "महसूल संवर्गातील कार्यरत, सेवानिवृत्त अधिकारी, कर्मचारी संवाद उत्कृष्ट अधिकारी, कर्मचारी पुरस्कार वितरण व मान्यवरांच्या हस्ते लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्र वितरण समारंभाचे आयोजन करण्यात येणार आहे.

२ ऑगस्ट रोजी "शासकीय जागेवर सन २०११ पूर्वीपासून रहिवासी प्रयोजनार्थ अतिक्रमण असलेल्या कुटूंबांपैकी अतिक्रमण नियमानुकूल करण्यास पात्र असलेल्या कुटूंबाना या अतिक्रमित जागांचे पटटे वाटप करणेबाबत कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. ३ ऑगस्ट रोजी पाणंद, शिवारस्त्यांची मोजणी करुन त्यांच्या दुतर्फा झाडे लावणे लावण्याचा उपक्रम हाती घेण्यात येणार असून ४ ऑगस्ट "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान प्रत्येक मंडळनिहाय राबविणे चे योजिण्यात आले आहे.

ठाणे ● शुक्रवार
●०१ ऑगस्ट २०२५
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पान ४

# केडीएमसीच्या सीएसआर कक्षाद्वारे सामाजिक उपक्रमांना चालना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रात विविध समाजपयोगी उपक्रम राबविण्याकरिता खाजगी औदयोगिक संस्था, बहुराष्ट्रीय कंपन्या इ. मार्फत कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी सीएसआर अंतर्गत अनेक सुविधा महानगरपालिकेमार्फत सामान्य नागरिकांपर्यंत उपलब्ध होऊ शकतात. या सीएसआर अंतर्गत निधी प्राप्त होऊन अथवा प्रत्यक्ष तज्ञ व्यक्तींच्या सहकार्याच्या माध्यमातून महापालिकेस अनेक सामाजिक उपक्रम राबविणे, कामे करणे सहज सुलभ होऊ शकते.

कल्याणडोंबिवली महानगरपालि केमार्फत खाजगी क्षेत्रातील संस्था, तज्ञ व्यक्ती इ. समवेत चर्चा घडवून योग्य नियोजनाव्दारे दिर्घकाळ टिकणा-या सुविधा, महापालिका प्रशासनावर कोणताही आर्थिक भार न येता निर्माण केल्या जाऊ शकतात. याच अनुषंगाने महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार अति.आयुक्त योगेश गोडसे यांच्या अध्यक्षतेखाली विशेष सीएसआर कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. महापालिकेचे लेखा व मुख्य वित्त अधिकारी दिग्विजय चव्हाण, शहर अभियंता अनिता परदेशी, नगररचना विभागाचे सहा.संचालक संतोष डोईफोडे, विशेष प्रकल्प विभागाच्या कार्यकारी अभियंता रोहिणी लोकरे, उपायुक्त प्रसाद बोरकर, कांचन गायकवाड, संजय जाधव हे या सीएसआर कक्षाचे सदस्य असून विद्युत विभागाचे कार्यकारी अभियंता प्रशांत भागवत हे या सीएसआर कक्षाचे सदस्य सचिव राहतील.

स्थानिक व्यवसाय, स्वयंसेवी संस्था तसेच इतर सरकारी संस्थाशी संवाद साधणे, संभाव्य सीएसआर निधी देणारे आणि भाग धारकांसह संवाद निर्माण करणे तसेच अपेक्षित परिणामांची रुपरेषा देणारे आकर्षक प्रस्ताव तयार करणे, सीएसआर कार्यक्रम आयोजित करणे, सीएसआर संधींना प्रोत्साहन देण्यासाठी कार्यशाळा परिषदा आयोजित करणे, सीएसआर माहिती, प्रकल्प व निधीचे उपलब्धतेसाठी समर्पित वेबसाईट तयार करणे आदी कामे या कक्षामार्फत केली जाणार आहेत. महापालिकेने केलेल्या या सीएसआर कक्षाच्या स्थापनेमुळे महापालिकेमार्फत भविष्यात राबविल्या जाणा-या समाज उपयोगी उपक्रमांना चालना मिळेल.

## शहापूर तालुक्यात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु !



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण(नरेंद्र पाटील) : ड्यू फाउंडेशनच्या वतीने शहापूर तालुक्यात स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरु करण्यात आले आहे.

तालुक्यातील ग्रामीण भागामधील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षेची आवड निर्माण होऊन भविष्यातील आव्हाने पेलण्यासाठी त्यांना सक्षम करणे हे उद्दिष्ट समोर ठेवून किन्हवली व चांग्याचा पाडा येथे मार्गदर्शन केंद्राची सुरुवात झाली आहे. सदर मार्गदर्शन केंद्राद्वारे 18 माध्यमिक शाळेतील 225 विद्यार्थ्यांना एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेचे मार्गदर्शन करण्यात येत आहे.

गरीब व होतकरू विद्यार्थ्यांना शालेय स्पर्धा परीक्षांसाठी विविध प्रकाशनाची पुस्तके, सराव प्रश्नपत्रिका संच, स्पर्धा परीक्षा संदर्भ पुस्तके, तालुक्यातील तज्ञ शिक्षकांचे मार्गदर्शन व्याख्याने, स्पर्धा परीक्षेचा पाया भक्कम करण्यासाठी आर्थिक मदत व नियोजन या शैक्षणिक वर्षात करण्यात आले असून येणाऱ्या काळात टप्प्याटप्प्याने तालुक्यातील काही भागात आणखी अभ्यास व मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचा फाउंडेशनचा मानस असल्याचे फाऊंडेशनचे अध्यक्ष उल्हास देवल यांनी म्हटले आहे.

# रेरा घोटाळ्यातील ६५ इमारती तुटणारच

## कायद्यापुढे कोणी मोठे नाही

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता


कल्याण : कल्याण डोंबिवली महानगर पालिकेतील बहुचर्चित बोगस रेरा नोंदणी केलेल्या ६५ इमारती वर कारवाई साठी न्यायालयाने पालिकेला आदेशित केले असताना मंत्री महोदयानी बाधित रहिवाश्यांना इमारतीवर कारवाई टाळण्याचे दिलेले आश्वासन हे लॉलीपॉप आहे. राजकारण्यांना फक्त निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन त्यांना इलेक्शनच्या आत या इमारती वाचवायच्या असून नंतर या इमारती तूटणार आहेत. कायद्या पुढे कोणी मोठे नसून ६५ इमारती तुटणार म्हणजे तुटणारच असल्याचा विश्वास याचिकाकर्ता संदीप पाटील यांनी व्यक्त करीत या इमारतीवरील कारवाई साठी पुढील आठवड्यात न्यायालयात अवमान याचिका दाखल करणार असल्याचे पत्रकारांना सांगितले.



कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील बोगस रेरा नोंदणी करून उभारलेल्या ६५ इमारतीचा घोटाळा उघडकीस आणून या इमारतीवर कारवाईसाठी न्यायालयात संदीप पाटील यांनी याचिका दाखल केली होती. न्यायालयाने या याचिकेवर निर्णय देत पालिकेला या ६५ इमारतीवर कारवाईचे आदेश दिले असताना पालिका प्रशासन वेळोवेळी काहीना काही कारणाची सबब देत चालढकलपणा करीत आहे. दोन वेळा कारवाई टाळण्यासाठी पोलिस बळ नसल्याची सबब दिली आहे. न्यायालयाचा आदेश ही पालिका प्रशासन जुमानत नसल्याने याचिका कर्ता संदीप पाटील यांनी महापालिकेला व इतर लोकांना तसेच पोलिस आयुक्तांनी नुकतीच कंटेंमची नोटीस दिली असल्याचे सांगितलं. दोन वेळा न्यायालयातील ऑर्ग्युमेंट मध्ये पोलिस बळ मिळत नसल्याचा अहवाल पालिकेने सादर केल्याने या बेकादेशीर बिल्डिंगी तोडल्या जात नसल्याने अखेरीस माझी नोटीस मागची प्रोसेस संपली असल्याने पुन्हा नोटीस देण्याची प्रोसिजर झाली असून त्याचा ड्राफ्ट ही तयार असून पुढील आठवड्यात न्यायालयात अवमान याचिका दाखल करणार असल्याचे सांगितले. या ६५ बिल्डिंगी निश्चितपणे तुटणार म्हणजे तुटणार असा ठाम विश्वास व्यक्त केला. इथे निश्चितपणे न्यायालयाचा अवमान झालेला असल्याने संबंधित अधिकाऱ्यावर कारवाई होऊन या बिल्डिंगी तुटणार म्हणजे तुटणार असे सांगितले.

### इमारतीवर कारवाई साठी न्यायालयात अवमान याचिका दाखल करणार - याचिकाकर्ता संदीप पाटील

या इमारतीवर कारवाई टाळण्यासाठी सरकार कडून जी आर काढला जाणार असल्याचे काही दिवसापूर्वी अधिवेशनाच्या काळात मंत्री उदय सामंत यांनी बाधित रहिवाश्यांना आश्वासन दिले होते. यावर त्यांनी मंत्री महोदयाची खिल्ली उडवीत त्यांनी दिलेली आश्वासने म्हणजे लॉलीपॉप असल्याचे सांगीत, कोणीच काही करू शकत नाही कायद्यापुढे कोणाचे काही चालू शकत नाही. यांना फक्त निवडणुका डोळ्यासमोर ठेऊन इलेक्शनच्या आत या इमारती वाचवायच्या असून नंतर या इमारती तोडणार आहेत. अशी कोणतीच प्रोसिजर कायद्यात नाही की या इमारती वाचू शकतील. त्यामुळे या इमारती नक्कीच तुटल्या जातील असा ठाम विश्वास याचिका कर्ता संदीप पाटील यांनी व्यक्त केला.




## सहकार पुरस्कारासाठी जिल्ह्यातील इच्छूक संस्थांनी प्रस्ताव सादर करावेत

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राज्याच्या सहकार चळवळीमध्ये उत्कृष्ट योगदान दिलेल्या राज्यातील सहकारी संस्थांना शासनामार्फत सहकार पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. रायगड जिल्ह्यातील महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 अंतर्गत नोंदणी झालेल्या इच्छूक सहकारी संस्थांनी आपले विहित नमुन्यातील प्रस्ताव कालबध्द कार्यक्रमानुसार दि.02/07/2025 ते 18/08/2025 या मुदतीत संबंधीत सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाकडे आवश्यक कागदपत्रांसह सादर करावेत, असे आवाहन जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, रायगड-अलिबाग प्र.का.जगताप यांनी केले आहे.

सन 2023-24 या आर्थिक वर्षातील कामगिरीच्या आधारावर "सहकार महर्षी" पुरस्कार 1, "सहकार भुषण" पुरस्कार 21 व "सहकार निष्ठ " पुरस्कार 23 याप्रमाणे सहकार पुरस्कारासाठी संस्थांची निवड करण्यात येणार आहे.

सर्व सहकारी संस्थांच्या पुरस्कारासाठीचे निकष व गुणांचा तपशिल याची सविस्तर माहीती सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य पुणे यांचे कार्यालयाच्या https://sahakarayukta.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर तसेच या कार्यालयात उपलब्ध आहेत.

## भिवंडी उपजिल्हा रुग्णालयात विशेष रक्त तपासणी मोहीम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : नागरिकांमध्ये हिपॅटायटिस बी आणि सी यांची तपासणी करून कावीळ चे निदान व्हावे आणि कावीळ वर नियंत्रण करणेसाठी भिवंडी महापालिका दवाखाना व शासनाच्या स्व.इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयात कावीळ तपासणी सप्ताह कार्यक्रम राबवण्यात आला. हिपॅटायटिस बी आणि सी संक्रमित व्यक्ती कडून दुसऱ्या व्यक्तीस होतो. बाधित व्यक्तीचे रक्त सुई द्वारे, बाधित व्यक्तीशी शारीरिक संबध, बाधित माते कडून मुलास संक्रमण होते. त्यामुळे या बाबत नागरिकांनी सावधगिरी बाळगण्याची गरज आहे असे मत रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षिका डॉ.माधवी पंदारे यावेळी व्यक्त केले. नागरिकांनी हिपॅटायटिस बी आणि सी प्रकारची काविळ होऊ नये म्हणून सुरक्षित शारीरिक संबध, अयोग्य टॅटू काढण्याची पद्धत टाळावी. तसेच प्रत्येक गरोदर मातेने आपल्या बाळाला संक्रमण होऊ नये म्हणून हिपॅटायटिस बी व सी तपासणी करू घ्यावी असे आवाहन डॉ. माधवी पंदारे यांनी केले.

यावेळी रुग्णालयात नागरिकांसाठी हिपॅटायटिस बी व सी रक्त तपासणी कार्यक्रम राबवण्यात आला, या मध्ये गरोदर माता आणि ART रुग्ण तसेच इतर सर्व ७८० नागरिकांचे रक्त तपासणी करून काविळ तपासणी करण्यात आली. या तपासणी दरम्यान ७ रुग्ण हिपॅटायटिस बी तर ३ रुग्ण हिपॅटायटिस सी प्रकाराची काविळ झालेले आढळून आले. या रुग्णांची पुढील रक्त चाचणी करण्यासाठी महालॅब कडे रक्त नमुने पाठवण्यात आले आहेत. यावेळी रुग्णालय प्रयोगशाळा विभागाकडून रुग्णांना हिपॅटायटिस बी आणि सी काविळ होऊ नये म्हणून प्रयोगशाळा वैज्ञानिक अधिकारी देविदास शेटगे, राजेंद्र शिंदे, अनिल वाघ, श्रीमती समीक्षा गायकवाड यांनी रुग्णांचे समुपदेशन व रुग्णांची रक्त तपासणी करीत हा राष्ट्रीय कार्यक्रम यशस्वी केला. तर शहरातील प्रभुआळी मंडई येथील महापालिकेच्या बी.जी.पी या दवाखान्यात डॉ.विद्या शेट्टी यांनी सुध्दा काविळ व आरोग्य तपासणी कार्यक्रम घेऊन जनजागृती मोहीम राबविली.

## 'उद्योजकता, नवोन्मेष आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण' या विषयावर सुनील म्हसकर यांचे व्याख्यान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



मुंबई : मंगळवार दिनांक २९ जुलै २०२५ रोजी इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय, नवी दिल्ली क्षेत्रीय केंद्र, मुंबई यांच्या विद्यमाने सुप्रसिद्ध व्याख्याते तथा शिक्षणतज्ज्ञ शारदासुत सुनील म्हसकर यांचे 'उद्योजकता, नवोन्मेष आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' या विषयावर उत्तम प्रकारचे व्याख्यान संपन्न झाले.

विद्यापीठाचे माननीय कुलगुरू प्रो. उमा कांजीलाल आणि प्रादेशिक सेवा विभागाचे माननीय संचालक डॉ. मनोरमा सिंग यांच्या प्रेरणेने 'राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२०' च्या ५व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून हे व्याख्यान ऑनलाईन - गूगल मीटवर आभासी स्वरूपात आयोजित केले होते. सदर व्याख्यानास विद्यापीठाचे सहायक क्षेत्रीय निदेशक डॉ. मिलिंद बी. पाटील, डॉ. पी. नंबूदिरिपाद आणि क्षेत्रीय निदेशक डॉ. राहुल मिश्र, अखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती कोंकण प्रांत कार्याध्यक्ष प्रवीण देशमुख, शिक्षणतज्ज्ञ तथा सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ.श्रीकांत पाटील, शिक्षणतज्ज्ञ डॉ. आनंद सावंत, प्रसिद्ध कवयित्री नंदा कोकाटे, साहित्य भारती धुळे, देवगिरी प्रांत अध्यक्ष प्राचार्य संजीव गीरासे, तज्ञ मार्गदर्शक विद्याधर म्हात्रे आदींची विशेष उपस्थिती लाभली.

यावेळी शारदासुत सुनील म्हसकर यांनी पॉवर पॉईंट प्रेजेंटेशनच्या (PPT) माध्यमातून सुंदर प्रकारे विविध मुद्द्यांचे सविस्तर विवेचन केले. उपस्थितांना मार्गदर्शन करताना सुनील म्हसकर सर म्हणाले की, "नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरण उत्तम शैक्षणिक तरतुदींसाठी केलेला संकल्पयुक्त आणि उत्कृष्ट प्रयत्न आहे. हे धोरण विद्यार्थ्यांना नवनवीन विविध कौशल्ये व तंत्र शिकण्यास प्रेरित करून त्यांना भविष्यात उत्तम व्यावसायिक संधी उपलब्ध करून देणारा असून या धोरणाच्या दूरदृष्टीत नमूद केलेला विश्वमानव होण्याची क्षमता निर्माण करणारा आहे. नवीन शैक्षणिक धोरण एक नवा दृष्टिकोन प्रदान करणारे, विविध शैक्षणिक पैलूंचे द्वार खुले करणारे, भारताला महासत्ता बनविण्यासाठी आणि आपला देश आत्मनिर्भर बनून विश्वगुरू होण्यासाठी एक 'पथदर्शक' असे आहे. ज्यावरून निष्ठापूर्वक मार्गक्रमण केल्यास समाज आणि राष्ट्राला समृद्ध बनविता येऊ शकते. म्हणूनच, हे नवीन शैक्षणिक धोरण अधिक क्रांतिकारी ठरू शकते."

यावेळी विद्यापीठाचे सहायक क्षेत्रीय निदेशक डॉ. मिलिंद बी. पाटील यांनी म्हटले की, "शिक्षणतज्ज्ञ सुनील म्हसकर सर यांनी अतिशय साध्या, सोप्या आणि उत्तम शैलीत व्याख्यान दिले. त्यातून त्यांची कुशाग्र बुद्धिमत्ता, अभ्यासू वृत्ती व सखोल वाचन आदी पैलूंचे दर्शन घडते. त्यांचे विद्यापीठातर्फे खूप खूप कौतुक आणि अभिनंदन!"

तर "सदर व्याख्यान युट्यूब, फेसबुक आदी प्रसारमाध्यमांवर प्रसारित करण्यात येणार असल्याने भविष्यात या व्याख्यानाचा लाभ अनेक विद्यार्थी, शिक्षक, साहित्यिक, शिक्षण क्षेत्रातील नामांकित विचारवंत व शिक्षणतज्ज्ञ तसेच समाजातील अनेक घटकांना निश्चितपणे होईल", असा आशावाद विद्यापीठाचे क्षेत्रीय निदेशक डॉ. राहुल मिश्र यांनी व्यक्त केला आहे. सुनील म्हसकर सर हे भिवंडी तालुक्यातील शेतकरी उन्नती मंडळ काल्हेर संचलित सिताराम रामा पाटील विद्यालय व रामदास दुंदा केणे कनिष्ठ महाविद्यालय येथे सहाय्यक शिक्षक आहेत. तसेच ते राष्ट्रीय पातळीवर उल्लेखनीय कार्य करणाऱ्या स्वामी विवेकानंद संस्थेचे संस्थापक अध्यक्ष असून आखिल भारतीय साहित्य परिषद पुरस्कृत साहित्य भारती कोंकण प्रांत कोषाध्यक्ष आहेत.

इंदिरा गांधी राष्ट्रीय मुक्त विश्वविद्यालय, नवी दिल्ली या भारतातील एका उत्तम विद्यापीठातर्फे शारदासुत सुनील म्हसकर यांना व्याख्यान देण्याचा बहुमान मिळाल्याबाबत समाजातील अनेक घटकांकडून सुनील म्हसकर सर यांचे मनःपूर्वक अभिनंदन व कौतुक करण्यात येत आहे.

### वज्रेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ शिक्षण संस्थेत

## अपुऱ्या शिक्षकांमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी तालुक्यातील वज्रेश्वरी शिक्षण प्रसारक मंडळ वज्रेश्वरी या शिक्षण संस्थेच्या न्यू.इंग्लिश वज्रेश्वरी, व रेणुका विद्यालय झिडके अशा दोन माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा आहेत. सदर ठिकाणी न्यू.इंग्लिश वज्रेश्वरी येथील इयत्ता 12 वी (एस्. वाय्.जे.सी.) विज्ञान शाखेत बहुसंख्य विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, परंतु गेल्या दीड महिन्यांपासून इंग्रजी व केमिस्ट्री या महत्वाच्या विषयांचे विषय शिक्षकच नसल्यामुळेच विद्यार्थ्यांचे अतोनात शैक्षणिक नुकसान होत आहे. याबाबत संबंधित पालकवर्ग अंधारातच आहे, त्यांना याबाबत जरासुद्धा कल्पना नाही, कारण सदर शिक्षण संस्थेचा परिसर हा ग्रामीण व दुर्गम असल्यामुळेच येथील विद्यार्थी हे आदिवासी, दलित, इतर मागासवर्गीय तसेच काही प्रमाणात पुढारलेल्या समाजाचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, पालकवर्गांनी अति विश्वासाने आपल्या मुलांना त्यांच्या भवितव्याचा विचार करून आपल्या मुलांना सदर ठिकाणी शिकण्यास पाठविले असतानाच, ज्या महत्वपूर्ण विषयाचे जर शिक्षकच नसतील तर या ठिकाणी शिकणा-या विद्यार्थ्यांचे भवितव्य बरबाद होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळेच संबंधित पालकवर्गासाठी सावधगिरी म्हणून याबाबत वृत्तपत्राचा प्रपंच म्हणून प्रसिद्ध केले जात आहे.

सदर शिक्षण संस्था ही नियमबाह्य तसेच बेकायदेशीर कारभार करण्यात सराईत आहे, त्याचबरोबर महत्वाचे उल्लेख करता येईल की, आत्ताच पार पडलेल्या पावसाळी विधानसभा अधिवेशनात भाजपा आमदार संजय उपाध्याय मुंबई-बोरीवली याने सदर शिक्षणसंस्थेच्या नियमबाह्य शिक्षक भरतीचा करोडो रुपयांचा शासनाची फसवणूक केलेल्या भ्रष्टाचाराची चौकशी कागदपत्र पुरावा देऊन करण्याची मागणी विधानसभा सभागृहात केलेली आहे, याबाबत शिक्षणविभाग राज्य शासनाकडून काय कारवाई होणार याबाबत येथील जाणकार नागरिक प्रतिक्षेत आहेत. तरी सदर शिक्षण संस्थेची मनमानी व ग्रामीण विद्यार्थ्यांचे भवितव्य उद्ध्वस्त करणाऱ्या शिक्षण संस्थेवर कारवाई करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे.

## पाते पिलवली गावचे समाजसेवक शंकर गोमाणे यांचे निधन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कोकण : चिपळूण तालुक्यातील पाते पिलवली ( खोलवाडी ) गावचे भूमिपुत्र शंकर य. गोमाणे ( वय वर्षे ६४ ) यांचे रविवार दि. २७ जुलै २०२५ रोजी पहाटे सुमारे २ वा.निधन झाले. स्व.शंकर गोमाणे म्हणजे वाडी, गाव, समाज व अनेक संस्थांशी जोडलेले व्यक्तिमत्व होते. गेली अनेक वर्षे कुणबी विकास मंडळ, ग्रामीण-मुंबई ( रजि.) उपरोक्त मंडळाचे जेष्ठ सल्लागार होते. वहाळ विभागात कुणबी बांधवांचे हक्काचे कुणबी भवन असावे याकरिता स्व-हक्काची जागा त्यांनी मंडळाला विनामोबदला देत सामाजिक दायित्व जपले होते. खोलवाडी नवतरुण विकास मंडळ ( पाते पिलवली ) या मंडळाचे माजी अध्यक्ष /जेष्ठ सल्लागार, ओमकार चाळ मित्र मंडळ ( दिवा-ठाणे ) ह्या मंडळाचे सल्लागार तर श्री पाणबुडी देवी कलामंच ( मुंबई ) मंडळाचे प्रमुख सल्लागार म्हणून कार्यरत होते. पातेपिलवली - वहाळ पंचक्रोशीतील सामाजिक कार्यातील एका तडफदार व हरहुन्नरी व्यक्तिमत्वाच्या आकस्मिक निधनाने पंचक्रोशी सुन्न झाली आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुलगे, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या अंत्यदर्शनाला पंचक्रोशीतील अनेक समाज बांधव उपस्थित होते. अनेकांकडून त्यांच्या पवित्र कार्याला भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.




## मुरबाडमध्ये 'अनुलोम' कार्यकर्ता संवाद मेळावा

### अभियानाला मुरबाडमधील अधिकारी वर्गाची दांडी !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड(दिलीप पवार) : "अनुलोम एकात्मिक विकास" अनुगामी लोकराज्य महाभियान कार्यक्रमा अंतर्गत मुरबाड मध्ये एम.आय.डी.सभागृह येथे कार्यकर्ता संवाद मेळाव्याचे आयोजन मुरबाड तहसीलदारांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आले होते. परंतु सदर कार्यक्रमाला तालुक्याच्या सर्व विभागाच्या वरिष्ठ अधिकार्यांनी उपस्थित राहावे असे लेखी कळवले असतानाही महसूल व आरोग्य व मुरबाड नगरपंचायत विभाग व्यतिरिक्त इतर विभागाच्या अधिकार्यांनी पाठ फिरवली असून या अधिकारी वर्गाला जनतेच्या प्रश्नांशी काही देणे घेणे नाही हेच यातून अधोरेखित होत असल्याचे दिसत आहे.



1 जुन 2016 रोजी तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अनुलोम या योजनेचा शुभारंभ केला होता. यामध्ये 2016 ते 20 पर्यंत कृषी, आरोग्य, शिक्षण, महसूल, ग्रामविकास अशा सर्वच क्षेत्रात सरकारी योजना थेट जनतेपर्यंत पोहचत होत्या. याच योजने मधून गाळमुक्त धरण व गाळमुक्त शिवार ही योजना यशस्वी झाली होती. राज्यातील 5000 धरण व तलावांचे काम झाल्याची माहिती अनुलोमचे लोकसभा उपविभाग प्रमुख प्रकाश लसणे यांनी दिली. प्रत्येक योजनांचा लाभ या माध्यमातून जनतेला मिळवून दिला आहे. कोरोना महामारीत हे काम थंडावले होते, परंतु आता देवेंद्र फडणवीस पुन्हा मुख्यमंत्री झाल्यानंतर पुन्हा या योजनेने भरारी घेतली असून सरकार आणि नागरिक यांच्यातील "अनुलोम" हा महत्वाचा दुवा असून अनुलोमचे कार्यकर्ते हे महत्वाचे काम करत आहेत.

या कार्यक्रमासाठी मुरबाड तहसील यांच्या वतीने निवासी नायब तहसीलदार अमोल शिंदे उपस्थित राहून महसूल विभागाकडून हवे ते सहकार्य मिळेल अशी ग्वाही दिली तर तालुका आरोग्य अधिकारी श्री धर बनसोडे यांनीही महत्वाचे मार्गदर्शन करताना आदिवासी महिला भगिनींचे अजूनही आधारकार्ड व पॅनकार्ड लिंक नसल्याने आरोग्य योजनांचा लाभ मिळण्यास अडचणी येत असल्याची खंत व्यक्त केली. दरम्यान अनुपस्थित असलेल्या अधिकार्यांवर कारवाई करावी अशी मागणी उपस्थित कार्यकर्त्यांनी केली असून तहसीलदार अभिजीत देशमुख यांच्या भुमिकेकडे लक्ष लागले आहे. या कार्यक्रमासाठी मुरबाड नगरपंचायतचे मा.नगराध्यक्ष मुकेश विशे, नगरसेवक अक्षय रोठे, महसूल विभागातील मानसी तेलवणे मॅडम, आवक जावक विभागाचे प्राण गायकवाड, सामाजिक कार्यकर्त्या ज्योती ताई गोडांबे, कल्पना पवार, सुनिल आलम, परेश मोरे, प्रविण घागस, महेश रायकर, विष्णू गायकवाड यांच्यासह तालुक्यातील अनुलोमचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुरबाड तालुक्याचे अनुलोम भाग जनसेवक प्रमुख दिनेश भावार्थे व त्यांच्या सहकार्यांनी या संवाद मेळाव्याचे आयोजन केले होते.

## शेतकऱ्यांच्या पिक नुकसान भरपाई तक्रारीचे निवारण करा

### रयत शेतकरी संघटनेची मागणी !

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : शेतकऱ्यांच्या पिक नुकसान भरपाई संदर्भात दिलेल्या तक्रारीचे निवारण करण्यात यावे अशी मागणी रयत शेतकरी संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.



नुकत्याच जाहीर झालेल्या शेतकऱ्यांच्या पिक नुकसान भरपाई यादीमध्ये त्रुटी होऊन अनेक शेतकऱ्यांची नावे समाविष्ट नाहीत त्यामुळे पीक नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना या भरपाई पासून वंचित राहावे लागणार असल्याने याबाबत रयत शेतकरी संघटनेचे ठाणे जिल्हा अध्यक्ष काळुराम घोडविंदे यांच्या मार्गदर्शनाखाली तालुका युवाध्यक्ष सचिन विशे यांनी शहापूर तहसिलदार व तालुका कृषी अधिकारी यांच्याकडे 10 जुलै रोजी रोजी निवेदन देऊन यासंदर्भात योग्य ती चौकशी होऊन शेतकऱ्यांना न्याय मिळण्याची मागणी केली होती.

दरम्यान, याबाबत कुठलीच कार्यवाही झाली नसल्याने सदर संघटनेच्या वतीने 29 जुलै रोजी पुन्हा निवेदन देऊन शेतकऱ्यांच्या पिक नुकसान भरपाई तक्रारीचे निवारण करावे अशी मागणी युवाध्यक्ष सचिन विशे यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.